# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि —४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) (द्वारा संचालीत राज्य विद्यापीठ)

**( परीक्षा व मुल्यमापन मंडळ)**

एम.आय.डी.सी.रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली—४४२६०५
फोन नंबर ०७१३२—२२३१०४


जा.क्र./गों.वि./परीक्षा विभाग/3482./२०२० दि. 08 /१०/२०२०

## परीपत्रक

## (नामांकन सत्र २०२०—२१)

**संदर्भ:**—१.परीक्षा विभागाचे पत्र क्र. गो.वि/परीक्षा विभाग/३३४८/२०२० दि.२३/०९ /२०२०
२.विद्या विभागाचे पत्र क्र. गोविग/विद्या/क्र/३०३/२० दि.२५/०९/२०२०

गोंडवाना विद्यापीठाशी सलग्नित महाविद्यालयातील सर्व प्राचार्य तथा संबंधित सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, विद्यापीठ कार्यक्षेत्रातील एकही विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहू नये यासाठी सर्व प्रवेश पात्र विद्यार्थ्यांना मा. कुलगुरू महोदयांच्या परवानगीने दिनांक २५/०९/२०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.याबाबतचे, विद्यार्थ्याचे नामांकन अर्ज दिनांक ०९/१०/२०२० पर्यंत विद्यापीठात सादर करण्याबाबत संदर्भीय क्र.१ नुसार कळविण्यात आलेले आहे.

संदर्भ क्र. २ नुसार विद्यापीठाशी संलग्नित बऱ्याच महाविद्यालयांच्या विनंतीनुसार विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहू नये यासाठी सर्व प्रवेश पात्र विद्यार्थ्यांना मा. कुलगुरू महोदयानी दिलेल्या मान्यतेनुसार **पदवी अभ्यासक्रमासाठी** दिनांक १५/१०/२०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. दिनांक २५/०९/२०२० ते दिनांक १५/१०/२०२० या कालावधीत घेतलेल्या सर्व प्रवेशित विद्यार्थ्याचे नामांकन अर्ज महाविद्यालयांनी दिनांक १७/१०/२०२० पर्यंत कार्यालयीन वेळेत योग्य शुल्कासह विद्यापीठात सादर करावे. यानंतर आलेल्या नामांकनासाठी नियमाप्रमाणे प्रति दिवस प्रति विद्यार्थी रूपये २५/— प्रमाणे विलंब शुल्क आकारण्यात येईल

तसेच दि. १५/१०/२०२० रोजी सायं. ५.३० वाजेनंतर प्रवेशाची लिंक बंद करण्यात येईल. त्यानंतर विद्यार्थ्याचे प्रवेश न झाल्यास त्यांची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालयांची राहील यांची नोंद घ्यावी.

(डॉ. अनिल झेड. चिताडे)
संचालक
परीक्षा व मुल्यमापन मंडळ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली